खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३ – २४

### खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी मा. देवेंद्रजी बुट्टे पाटील

पुढारी

# अध्यक्षपदी देवेंद्र बुट्टे पाटील कायम

## खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ; धर्मादाय उपायुक्तांचा निकाल

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांची खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदावरील नियुक्ती तत्त्वतः वैध असल्याचा निकाल धर्मादाय उपायुक्त राहुल मामू यांनी बुधवारी (दि. २४) दिला. या निकालानुसार संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर आणि संचालक मंडळाला काम करण्याची तत्त्वतः मान्यता मिळाली आहे. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या निवडीवर ॲड. राजेश कांडगे यांनी धर्मादाय आयुक्तांकडे आक्षेप नोंदवला होता. त्यावर तब्बल दोन वर्षांनी निकाल देण्यात आला.

> “ हा निकाल नसून, धर्मादाय उपायुक्तांनी फक्त तत्त्वतः मान्यता दिली आहे. अध्यक्षपदाबाबत कायमस्वरूपी घराणेशाही आणणारे धोरण वार्षिक सभेत अवलंबिले आहे. असेच अनेक सोयीचे ठराव मंजूर करून घेण्यात आले आहेत. त्याविरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार आहोत.
>
> **- ॲड. राजेश कांडगे**

याबाबत माहिती देण्यासाठी शनिवारी (दि. २७) देवेंद्र बुट्टे पाटील यांनी पत्रकार परिषद घेतली. या वेळी संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी राजेश कांडगे यांच्यावर जोरदार टीका केली. त्याच वेळी माजी आमदार व संस्थेचे अध्यक्ष, मानद सचिव राहिलेल्या ॲड. राम कांडगे यांचे संस्थेला सहकार्य असल्याचा उल्लेख आवर्जून केला.

मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक हिरामण सातकर, बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, राजेंद्र टाकळकर, ॲडव्होकेट बाळासाहेब लिंभोरे, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय शिंदे या वेळी उपस्थित होते. खेड तालुक्यातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन शिक्षण देणारी एकमेव मोठी संस्था म्हणून खेड तालका शिक्षण प्रसारक मंडळ परिचित आहे. जवळपास सात हजार विद्यार्थी येथे उच्च शिक्षण घेत आहेत. माजी आमदार स्व. साहेबराव बुट्टे पाटील यांनी ही संस्था उभारली.

दोन वर्षांपूर्वी सभासदांच्या सर्वसाधारण सभेत देवेंद्र बुट्टे पाटील यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. त्याला राजेश कांडगे व ४९ सभासदांचा विरोध झाल्याने संस्थेला न्यायालयीन लढा लढावा लागला. त्यात देवेंद्र बुट्टे पाटील व संचालक मंडळाला दिलासा मिळाला. याशिवाय, राजेश कांडगे व ४९ जणांचे सभासदत्व रद्द करण्याचा या सभेचा ठरावसुद्धा उपायुक्तांनी मान्य केला आहे.



आक्षेपाबाबत माहिती देताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील व इतर मान्यवर.

My Gramin Edition
May 28, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

मे २०२३ ग्रामीण पुणे ६

# सेवाभावी वृत्तीने काम करा : ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील



राजगुरूनगर (दै. संध्या) :

न्यायदानाच्या क्षेत्रात पोलिसांची भूमिका महत्त्वाची असल्याने नव्याने पोलीस झालेल्या विद्यार्थ्यांनी अत्यंत तटस्थपणे, सेवाभावी वृत्तीने काम करण्याचे आवाहन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात नुकत्याच झालेल्या पोलीस भरतीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात बोलत होते.

या प्रसंगी व्यासपिठावर संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर होते. कार्यक्रमासाठी संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर पाटील, एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच.एम. जरे, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, अरविंद दौंडकर, डॉ. दिलीप मुळूक, प्रबंधक कैलास पाचारणे आणि मोठ्या संख्येने पोलीस झालेले विद्यार्थी आपल्या पालकांसह उपस्थित होते.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील पुढे म्हणाले की सैनिक आणि पोलीस हे देशाचे आधारस्तंभ असून त्यांच्यामुळेच नागरिकांचे हक्क आणि संरक्षण होत असते. नव्याने पोलीस झालेल्या विद्यार्थ्यांनी अत्यंत मेहनतीने यश प्राप्त केले असून सर्व विद्यार्थी कौतुकास पात्र आहेत.

गरजुंना मदतीची भावना ठेवावी आणि सेवांतर्गत परीक्षांची तयारी करून चांगल्या पदावर जावे असे त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले. महाविद्यालयात पोलीस अॅकेडमी सुरू करण्याचा मानस त्यांनी यावेळी व्यक्त केला.

उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी बोलताना, विद्यार्थ्यांना आपल्या आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून चाकोरीबाहेरील काम न करण्याचे आवाहन केले.

संचालक हिरामण सातकर यांनी विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीचे सोने करून कुटुंबाचे नाव उज्वल करावे, असे सांगितले.

याप्रसंगी जयश्री वाडेकर, मृणाल घनवट, कोमल शिंदे, पूजा राक्षे, प्राजक्ता गोगडे, संदेश डांगले या पोलीस झालेल्या विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली.

या कार्यक्रमात संस्थेच्या वतीने सुमारे ६० हून अधिक पोलीस विद्यार्थ्यांचा पालकांसह शाल, श्रीफळ, गुलाबपुष्प व पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. त्यांच्या पुढील कारकीर्दीस शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी, सूत्रसंचालन मच्छिंद्र मुळूक यांनी तर आभार डॉ. योगेश वाळुंज यांनी मानले.

प्रभात

जिल्हा

# अॅड. देवेंद्र बुट्टे पाटलांची नियुक्ती वैध

## उप धर्मदाय आयुक्तांचा निर्णय : खेड शिक्षण मंडळास काम करण्याचा अधिकार



**राजगुरूनगर, दि २६ (प्रतिनिधी)** - खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळास काम करण्याचा अधिकार राहिल, असा निर्णय उपधर्मदाय आयुक्त पुणे यांच्या न्यायालयाने नुकताच दिला आहे. तसेच अध्यक्षपदी अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांची नियुक्ती वैध ठरविली आहे.

संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर आणि संचालक मंडळासही काम करण्याचा अधिकार राहील असा निर्णय दिला आहे. गेली दोन वर्षांपासून या प्रकरणाची सुनावणी पुणे उपधर्मादाय आयुक्तांच्या समोर सुरू होती. त्याचा निकाल अॅड. बुट्टे पाटील आणि संचालक मंडळाच्या बाजूने लागला. तसेच खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाने विशेष सर्वसाधारण सभेत केलेल्या घटनादुरुस्तीलाही मंजुरी दिली. अॅड. राजेश कांडगे यांचा अध्यक्ष असल्याचा दावा न्यायालयाने फेटाळला. अॅड. देवेंद्र बुट्टे पाटील म्हणाले की , सत्याचा विजय झाला असून संस्थेच्या सभासदांनी दाखविलेला विशासाला पात्र राहण्याचा प्रयत्न करणार आहे. नानासाहेब टाकळकर यांनी सांगितले की, संस्थापक अध्यक्ष स्व. साहेबराव बुट्टे पाटील यांच्या आशीर्वादरुपी भावना आमच्या पाठिशी असल्यामुळे सत्याचा विजय झाला आहे. धर्मदाय आयुक्तांच्या निकालामुळे संस्थेच्या अध्यक्षपदाबद्दलचा संभ्रम दूर झाल्याची भावना मानद सचिव हरिभाऊ सांडभोर व ज्येष्ठ संचालक शांताराम घुमटकर यांनी व्यक्त केली.

PuneDistrict, 27 May 2023, Page:003
https://epaper.dainikprabhat.com

लोकमत

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ अध्यक्षपदी देवेंद्र बुट्टे-पाटील

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांची नियुक्ती उपधर्मदाय आयुक्तांनी कायम ठेवली आहे. संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर आणि संचालक मंडळासही काम करण्याचा अधिकार राहील, असेही उपधर्मदाय आयुक्तांनी आपल्या निर्णयात म्हंटले आहे.



गेली दोन वर्षांपासून सदर प्रकरणाची सुनावणी मा. उपधर्मादाय आयुक्तांच्या समोर सुरू होती. त्याचा निकाल ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील आणि संचालक मंडळाच्या बाजूने लागला. महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० सेक्शन २२(२) नुसार न्यायालयाने खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष म्हणून काम करण्याची परवानगी ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील आणि संचालक मंडळाला दिली. तसेच खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाने विशेष सर्वसाधारण सभेत केलेल्या घटना दुरुस्तीलाही मंजुरी दिली. ॲड. राजेश कांडगे यांचा अध्यक्ष असल्याचा दावा न्यायालयाने फेटाळला.

या निकालावर प्रतिक्रिया देताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी समाधान व आनंद व्यक्त केला. सत्याचा विजय झाला असून संस्थेच्या सभासदांनी दाखविलेला विश्वासाला पात्र राहण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी सांगितले की संस्थापक अध्यक्ष स्व. साहेबराव बुट्टे पाटील यांच्या आशीर्वादरूपी भावना आमच्या पाठीशी असल्यामुळे सत्याचा विजय झाला आहे. धर्मदाय आयुक्तांच्या निकालामुळे संस्थेच्या अध्यक्षपदाबद्दलचा संभ्रम दूर झाल्याची भावना मानद सचिव हरिभाऊ सांडभोर व ज्येष्ठ संचालक शांताराम घुमटकर यांनी व्यक्त केली.

Hello Pune Gramin
Page No. 8 May 27, 2023
Powered by: erelego.com

HRM

केसरी
राष्ट्रीय ठेवा

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी देवेंद्र बुट्टे पाटीलच!

## न्यायालयाच्या निकालाने शिक्कामोर्तब

**राजगुरुनगर, (वार्ताहर) :** उपधर्मादाय आयुक्त पुणे यांच्या न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी देवेंद्र बुट्टे पाटील यांची नियुक्ती वैध ठरविली असून संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर आणि संचालक मंडळासही काम करण्याचा अधिकार राहील असा निर्णय दिला आहे. गेली दोन वर्षांपासून या प्रकरणाची सुनावणी उपधर्मादाय आयुक्त कार्यालयात सुरू होती. त्याचा निकाल देवेंद्र बुट्टे पाटील आणि संचालक मंडळाच्या बाजूने लागला.

महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० कलम २२ (२) नुसार न्यायालयाने खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष म्हणून काम करण्याची परवानगी देवेंद्र बुट्टे पाटील आणि संचालक मंडळाला दिली. तसेच खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाने विशेष सर्वसाधारण सभेत केलेल्या घटनादुरुस्तीलाही मंजुरी दिली. राजेश कांडगे यांचा अध्यक्ष असल्याचा दावा न्यायालयाने फेटाळला आहे.

या निकालावर प्रतिक्रिया देताना संस्थाध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील यांनी समाधान व आनंद व्यक्त केला. सत्याचा विजय झाला असून संस्थेच्या सभासदांनी दाखविलेला विश्वासाला पात्र राहण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी सांगितले की, संस्थापक अध्यक्ष स्व. साहेबराव बुट्टे पाटील यांच्या आशीर्वादरुपी भावना आमच्या पाठिशी असल्यामुळे सत्याचा विजय झाला आहे. धर्मादाय आयुक्तांच्या निकालामुळे संस्थेच्या अध्यक्षपदाबद्दलचा संभ्रम दूर झाल्याची भावना मानद सचिव हरिभाऊ सांडभोर व ज्येष्ठ संचालक शांताराम घुमटकर यांनी व्यक्त केली.

दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी 'ॲड. देवेंद्र बुट्टे पाटीलच !'



राजगुरुनगर (दैनिक संध्या) : उपधर्मादाय आयुक्त पुणे यांच्या न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांची नियुक्ती वैध ठरविली असून संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर आणि संचालक मंडळासही काम करण्याचा अधिकार राहील असा निर्णय दिला आहे. गेली दोन वर्षांपासून या प्रकरणाची सुनावणी उपधर्मादाय आयुक्त कार्यालयात सुरू होती. त्याचा निकाल ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील आणि संचालक मंडळाच्या बाजूने लागला. महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० सेक्शन २२(२) नुसार न्यायालयाने खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष म्हणून काम करण्याची परवानगी ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील आणि संचालक मंडळाला दिली. तसेच खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाने विशेष सर्वसाधारण सभेत केलेल्या घटनादुरुस्तीलाही मंजुरी दिली. ॲड. राजेश कांडगे यांचा अध्यक्ष असल्याचा दावा न्यायालयाने फेटाळला आहे. या निकालावर प्रतिक्रिया देताना संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी समाधान व आनंद व्यक्त केला. सत्याचा विजय झाला असून संस्थेच्या सभासदांनी दाखविलेला विश्वासाला पात्र राहण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी सांगितले की संस्थापक अध्यक्ष स्व. साहेबराव बुट्टे पाटील यांच्या आशीर्वादरुपी भावना आमच्या पाठिशी असल्यामुळे सत्याचा विजय झाला आहे. धर्मादाय आयुक्तांच्या निकालामुळे संस्थेच्या अध्यक्षपदाबद्दलचा संभ्रम दूर झाल्याची भावना मानद सचिव हरिभाऊ सांडभोर व ज्येष्ठ संचालक शांताराम घुमटकर यांनी व्यक्त केली.

पुणे आवृत्ती
बातम्यांचा राजा
जनप्रवास
मुंबई, पुणे, सांगली, कोल्हापूर, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध. RNI NO. MAHMAR/2013/57952

## न्यायालयाच्या निकालाने शिक्कामोर्तब

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी देवेंद्र बुट्टे पाटील

राजगुरुनगर
जनप्रवास : वार्ताहर

उपधर्मादाय आयुक्त पुणे यांच्या न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी ड. देवेंद्र बुट्टे पाटील यांची नियुक्ती वैध ठरविली असून संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर आणि संचालक मंडळासही काम करण्याचा अधिकार राहील असा निर्णय दिला आहे. गेली दोन वर्षांपासून या प्रकरणाची सुनावणी उपधर्मादाय आयुक्त कार्यालयात सुरू होती. त्याचा निकाल ड. देवेंद्र बुट्टे पाटील आणि संचालक मंडळाच्या बाजूने लागला.



महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट क्ट १९५० सेक्शन २२(२) नुसार न्यायालयाने खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष म्हणून काम करण्याची परवानगी ड. देवेंद्र बुट्टे पाटील आणि संचालक मंडळाला दिली. तसेच खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाने विशेष सर्वसाधारण सभेत केलेल्या घटनादुरुस्तीलाही मंजुरी दिली. ड. राजेश कांडगे यांचा अध्यक्ष असल्याचा दावा न्यायालयाने फेटाळला आहे.

**गेली दोन वर्षांपासून या प्रकरणाची सुनावणी उपधर्मादाय आयुक्त कार्यालयात सुरू होती**

या निकालावर प्रतिक्रिया देताना संस्थाध्यक्ष ड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी समाधान व आनंद व्यक्त केला. सत्याचा विजय झाला असून संस्थेच्या सभासदांनी दाखविलेला विश्वासाला पात्र राहण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेचे उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी सांगितले की संस्थापक अध्यक्ष स्व. साहेबराव बुट्टे पाटील यांच्या आशीर्वादरुपी भावना आमच्या पाठिशी असल्यामुळे सत्याचा विजय झाला आहे. धर्मादाय आयुक्तांच्या निकालामुळे संस्थेच्या अध्यक्षपदाबद्दलचा संभ्रम दूर झाल्याची भावना मानद सचिव हरिभाऊ सांडभोर व ज्येष्ठ संचालक शांताराम घुमटकर यांनी व्यक्त केली.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**